# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

**Email ID – sp.hingoli@mahapolice.gov.in, Contact No.-8669900676**

**Date - 14/ 06/2022**

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १३/०६/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १६६ वाहन चालकाविरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचेकडुन ९४,५००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री कर अंतर्गत दिनांक १३/०६/२०२२ रोजी दारूबंदी कायद्या अंतर्गत विविध पोलीस स्टेशन अतंर्गत एकुण ०४ ठिकाणी छापा मारून कार्यवाही करून आरोपीतांकडुन २०.०७ लिटर दारू असा एकुण ८,७८०/—रू कि.अं ची अवैध दारूचा साठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द दारूबंदी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळवणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत विशेष मोहिम राबविली जात असुन या मोहिमे अंतर्गत दिनांक १३/०६/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे औंढा नागनाथ हददीत छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन नगदी व जुगाराचे साहित्य असा एकुण १०३०/—रू माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**वाहतुकीस अडथळा होईल अशा स्थितीत वाहन ठेवणाऱ्या विरूध्द कार्यवाही:—**

दिनांक १३/०६/२०२२ रोजी हिंगोली जिल्हा अतंर्गत कलम २८३ भादवि प्रमाणे ०६ गुन्हे दाखल करण्यात आले असुन आरोपी हे आपले ताब्यातील गाडा, ॲटोरिक्षा, जिप लावुन येणाऱ्या जाणाऱ्यास धोका अटकाव निर्माण होईल अषा स्थितीत मिळुन आले या संदर्भात हिंगोली जिल्हा पोलीस तपास करीत आहे .

**जिल्हा पोलीस दलातर्फे महिला विषयक जनजागृतीपर जननी सुरक्षा कार्यक्रम :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली श्री.एम.राकेश कलासागर यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात पोलीस दलाकडुन महिला व बालकां संबंधि होणारे अन्याय व अत्याचार थांबले पाहिजेत .महिलां व बालकांना त्यांच्या सुरक्षे संबंधि कायदे व नियम यांचे माहिती होवुन त्यांच्यात जनजागृती व्हावी या व्यापक हेतुने जननी हा कार्यक्रम संपुर्ण जिल्हयात राबविण्यात येत आहे.

**गुंगी आणनारे प्रतिबंधीत झाडाची लागवड करण्यारे विरुध्द कार्यवाही:—** दिनांक १३/०६/२०२२ रोजी फिर्यादी संतोष माधवराव मुपडे, पोउपनि हिंगोली ग्रामीण यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली ग्रामीण येथे कलम २०,२०(बी)(आय)गुंगीकारक औषध द्रव्य मनोव्यापारावर परिणाम कारणारे पदार्थ अधिनियम १९८५ प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.१२.०६.२०२२ रोजी चे २१:०० वा. दरम्यान मौजे सवड येथे आरोपीचे घराचे पाठीमागे मोकळया जागेत स्वताचे फायदयासाठी गुंगी आणनारे प्रतिबंधीत झाडाची लागवड केली असतांना मिळुन आले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली ग्रामीण पोलीस तपास करित आहेत.